पुण्य नगरी



# भारताच्या सांस्कृतिक वारशावर आधारित कौशल्ये विकसित करावे : डॉ. फिरोदिया

## विश्वकर्मा विद्यापीठ, पुणेचा ६ वा पदवीदान सोहळा संपन्न

**पुणे** : भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशावर आधारित कौशल्ये विकसित करावे, आपली संस्कृती टिकून राहणार आहे, यावर ठाम विश्वास ठेवा, असे आवाहन फोर्स मोटर्सचे चेअरमन डॉ. अभय फिरोदिया यांनी केले.

विश्वकर्मा विद्यापीठ, पुणे यांनी २०२४ च्या पदवीधरांचा पदवीदान समारंभ आयोजित केला होता. यावेळी डॉ. फिरोदीया बोलत होते. यावेळी विश्वकर्मा विद्यापीठाचे अध्यक्ष भारत अगरवाल तसेच विविध मान्यवर उपस्थित होते. यावेळी एकूण ८५० विद्यार्थ्यांना विविध पदवी, पदव्युत्तर, पीएचडी आणि डिप्लोमा कोर्सेसमधील पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये आर्किटेक्चर ४४, आर्ट आणि डिझाईन ८४, वाणिज्य आणि व्यवस्थापन १६७, मानव्य आणि समाजशास्त्र १४२, विधी ११४, मीडिया आणि कम्युनिकेशन १५, फार्मसी ९६, विज्ञान आणि तंत्रज्ञान १८८ अशा विविध शाखांमधील विद्यार्थ्यांचा यात समावेश होता.

डॉ. अभय फिरोदिया यांनी यावेळी भारताची २१व्या शतकातली प्रगती अधोरेखित करत त्यांनी पदवीधरांना प्रेरणादायी, आशावादी जीवन जगण्यासाठी आणि समाजात अर्थपूर्ण योगदान देण्यासाठी प्रोत्साहित केले.

भारत अगरवाल यांनी पदवीधरांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आणि भविष्यातील यशस्वी प्रवासात त्यांना एकमेकांशी तसेच विद्यापीठाशी संपर्कात राहण्याचे आवाहन केले. तुम्ही एकमेकांशी तसेच विद्यापीठाशी देखील संपर्कात राहा. आपल्या आजी आणि माजी विद्यार्थ्यांसाठी विविध संधी उपलब्ध आहेत. तसेच, नवीन विद्यार्थ्यांशी तुमचे अनुभव शेअर करण्यासाठी आम्ही तुम्हाला विद्यापीठात नक्की आमंत्रित करू, असे त्यांनी सांगितले.

विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे पुढच्या पिढीतील नेत्यांची जडण-घडण झाली आहे.